महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७
ई-मेल -dokh.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक:- गौखनि-५०/१११८/प्र.क्र.४१५/ख
महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-०४ सप्टेंबर, २०१९

विषय:- गौण खनिज-भंडारा
सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता मौजे तामसवाडी, ता.तुमसर, जि.भंडारा या वाळूगटातून उत्खनन न करता आलेल्या वाळूच्या प्रमाणात प्रमाणशीर रक्कम परत करणेबाबत.
मे. आनंद ॲन्ड मंडल असोसीएट, प्रो.प्रा.अनिरुध्द हरीहर मंडल

शासन ज्ञापन :-

जिल्हाधिकारी, भंडारा यांना त्यांचे पत्र क्र.आसन-१४/कलि/खनिज/कावि/६९९/ २०१८, दि.२०/१०/२०१८ व क्र.आसन-१४/खनिज/कलि/कावी/७७/ २०१९, दि.१/२/२०१९ रोजीच्या उपरोक्त विषयावरील पत्रास अनुलक्षून असे कळविण्यात येते की, सन २०१७-१८ मधील मौजे तामसवाडी, ता.तुमसर, जि.भंडारा हा वाळूगट सर्वोच्च बोलीस रु.२,२२,९५,३९१/- एवढ्या रक्कमेस मे.आनंद ॲन्ड मंडल असोशिएट, प्रो.प्रा.अनिरुध्द हरिहर मंडल यांना मंजूर करण्यात आला. लिलावधारक यांनी उक्त वाळूगटाच्या लिलावाची १/४ रक्कम विहित कालावधीत भरणा केली. तथापि, उर्वरित ३/४ रक्कम विहित कालावधीत शासनजमा न केल्याने जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि.७/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये लिलावाची १/४ रक्कम शासनजमा करुन सदर वाळूगट रद्द केला.

०२. लिलावधारक यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे उर्वरित रक्कम भरण्यास वैयक्तीक अडचण असल्याचे कारण देवून सदर वाळूगटाची उर्वरित ३/४ रक्कम भरण्यास परवानगी मागितली. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दि.११/१/२०१८ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागाने दि.१७/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेने मौजे तामसवाडी या वाळूगटाची ३/४ रक्कम भरण्यास “एक विशेष बाब” म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार लिलावधारक यांनी उर्वरित ३/४ रक्कम शासनजमा केली. लिलावधारक यांना दि.९/३/२०१८ रोजी उक्त वाळूगटाचा ताबा देण्यात आला. तथापि, मे.किंझा ट्रेडर्स यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.१४८७/२०१८ दाखल केली. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दि.३/५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये व तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र.१३०४८/२०१८ व १२६६९/२०१८ अन्वये सदर प्रक्रिया नियमानुसार योग्य नसल्याने सदर रेतीघाटाची प्रक्रिया रद्द करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले.

०३. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेशावरुन संबंधित लिलावधारकाकडून दि.७/५/२०१८ रोजी उक्त वाळूगटाचा ताबा परत घेण्यात आला. लिलावधारक श्री.अनिरुध्द ह.मंडल यांनी सदर वाळूगटाची प्रक्रिया रद्द झाल्याने मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र.६५/२०१८ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१८२५/२०१८ अन्वये शासनजमा केलेली रक्कम परत मिळण्याची विनंती केली.

०४. शासन निर्णय दि.१२/३/२०१३ मधील परिच्छेद C-१५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लिलावधारकाकडून वाळू गटाचा ताबा काढून घेण्यात आला असल्याने व लिलावधारकाने सदर वाळूगटाच्या लिलावाची उर्वरित ३/४ रक्कम वेळेत न भरल्यामुळे लिलावाची १/४ रक्कम रु.५५,७३,८४८/- जप्त करुन परताव्याची अनुज्ञेय रक्कम रु.५३,१८,८७३/- (रुपये त्रेपन्न लक्ष अठरा हजार आठशे त्र्याहत्तर फक्त) परत करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

०५. सबब लिलावधारक मे.आनंद ॲन्ड मंडल असोशिएट, प्रो.प्रा.अनिरुध्द हरिहर मंडल यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापुर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर लिलावधारक परताव्याची अनुज्ञेय रक्कम रु.५३,१८,८७३/- (रुपये त्रेपन्न लक्ष अठरा हजार आठशे त्र्याहत्तर फक्त) अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०६. या बाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग" १०२-खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन,९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतूमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०७. सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दि.८/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९०५११४५५१२३१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.09.05 11:52:32 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

जिल्हाधिकारी, भंडारा,

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा
५) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) निवडनस्ती (कार्यासन “ख”), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.